कोकणसाद
www.kokansad.com
मंगळवार, दि. १९ जुलै २०२२





प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर व इतर मान्यवर.

# प्रा. गाथाडेंच्या 'गावठाण'ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनचा पुरस्कार जाहीर

**कोकणसाद वृत्तसेवा**

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांच्या 'गावठाण' कथासंग्रहाला लातूर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर अकॅडेमीच्या वतीने देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे.

त्याच अनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर यांच्याहस्ते महाविद्यालयात त्यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

गाथाडे यांचा 'गावठाण' हा पहिलाच कथासंग्रह असून या कथासंग्रहामधून त्यांनी हुंडा, बेरोजगारी, दुष्काळ, ग्रामीण शहरी संघर्ष, शेतकऱ्यांचे प्रश्न, नैतिक - अनैतिक संबंध, पाणी, स्मशानभूमी आणि शिक्षण व्यवस्थेमधील प्रश्न मांडले आहेत. यापूर्वी त्यांच्या कथासंग्रहाला अण्णाभाऊ साठे पुरस्कार, संकेत प्रकाशनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार मिळाले आहेत. या कथासंग्रहाला हा तिसरा पुरस्कार प्राप्त झाला आहे. रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असून ३१ जुलैला लातूर येथे या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. राजेंद्र केरकर, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर व सहकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.